शासनाच्या मालकीच्या विमान/हेलिकॉप्टर वरील नियुक्त DGCA मान्यता प्राप्त वैद्यकीय अधिका-याच्या मानधनामध्ये वाढ करणेबाबत.

<u>महाराष्ट्र शासन</u>
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.विचासं-१११८/प्र.क्र.७७/ २८-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि. ३ मे, २०१८.

<u>वाचा</u>: १) दिनांक ६/४/२०१८ च्या मा.शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीचे क्र.विचासं-१११८/प्र.क्र.३५/२८अ, दिनांक २३/४/२०१८ चे इतिवृत्त.
२) उपसंचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई यांचे पत्र क्र. डीए/ एडीएम/४३८/२०१८, दि.२५/४/२०१८ चे पत्र.

<u>प्रस्तावना :</u>

राज्यातील शासनाच्या मालकीच्या विमान/हेलिकॉप्टर ने अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाई उड्डानापूर्वी केंद्र शासनाच्या नागरी विमानन प्राधिकरणाच्या नियमानुसार वैमानिकांची प्री फ्लाईट मेडिकल चाचणी घेण्यात येते. या चाचणीसाठी डी.जी.सी.ए.प्रमाणित वर्ग-२ च्या वैद्यकीय अधिका-याला दरमहा रु.२०,०००/-प्रमाणे मानधन देण्यात येते. गेल्या तीन वर्षात महागाई निर्देशांकात वाढ झाली आहे. त्यामुळे विमानचालन संचालनालयानी शासनाच्या मालकीच्या विमान व हेलिकॉप्टरसाठी नियुक्त DGCA मान्यता प्राप्त वैद्यकीय अधिका-याच्या मानधनामध्ये दरमहा रु.२०,०००/- ऐवजी रु.३०,०००/- इतके मानधन दोन वर्षाकरीता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास दिनांक ६/४/२०१८ रोजीच्या शक्तीप्रदत्त समितीच्या बैठकीत अनुमती प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :

शासनाच्या मालकीच्या विमान व हेलिकॉप्टर वरील नियुक्त DGCA मान्यता प्राप्त वैद्यकीय अधिका-यास दरमहा रु.३०,०००/- इतके मानधन देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. याबाबतचा होणारा खर्च मागणी क्र.ए-४, “२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमान चालन विषयक सल्लागार, महाराष्ट्र शासन (अनिवार्य) २०७० ०१५६” या लेखाशिर्षातंर्गत ५०-**इतर खर्च** या उद्दिष्टाखालील सबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. या संदर्भात उप संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरहू आदेश विमानचालन विभागाच्या विविध बाबींवर निर्णय घेण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८०५०३१५३२२७०९०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sandhya Ashok Bageshwar

Digitally signed by Sandhya Ashok Bageshwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d4a8d57e69da6499480bc974f18dca56ad5541c4795df9434c3e826318ec8ea, serialNumber=ba5a637883d7b445558182d1fd79c7e47a2d65e5094f71fb0ec8c5d23b0cc880, cn=Sandhya Ashok Bageshwar
Date: 2018.05.03 15:34:35 +05'30'

(सं.अ.बागेश्वर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
२. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. निवडनस्ती